Vol - VI Issue - VI JUNE 2019 Peer Review e-Journal Impact Factor 5.707 ISSN 2349-638x

# केंद्रीय रेलसाईड वेअरहाऊस कंपनी लि. चा आर्थिक अभ्यास

**डॉ. अरुण बळीराम धालगडे**
विभागप्रमुख, वाणिज्य विभाग,
महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा

**प्रस्तावना-**

केंद्रीय रेलसाईड वेअरहाऊस कंपनी लि. ही कंपनी केंद्रीय वखार महामंडळाची सहाय्यक कंपनी आहे. हिची स्थापना १०.०७.२००७ रोजी झाली आहे. कंपनी कायदा १९५६ च्या कलम १४९ (३) च्या आधीन राहून २४.०७.२००७ पासून कार्य करण्याचे प्रारंभ प्रमाणपत्र प्राप्त केले आहे. त्यानुसार कंपनी सध्या कार्यरत आहे. व्यापारासाठी मोठा 'कृती मल्टीमॉडल आराखडा' तयार करून बहुअंगी फेर साठवणूक सेवा प्रदान करून साठवणूक खर्च कमी करण्यासाठी भारतीय अर्थव्यवस्थेला सहकार्य करीत आहे. सर्व हितधारकांच्या फायद्यासाठी साठवणूक खर्च कमी करून कार्यक्षम रेल्वेवर आधारीत संपूर्ण साठवणूकीचा फायदा उपलब्ध करून देण्याचे लक्ष्य घेऊन कार्यरत आहे.

**संशोधनपत्राचे उद्देश-**

१. केंद्रीय रेलसाईड वेअरहाऊस कंपनी लि. विषयीची माहिती गोळा करुन अभ्यास करणे.
२. केंद्रीय रेलसाईड वेअरहाऊस कंपनी लि. चा आर्थिक अभ्यास करणे.

**माहिती संकलनाचे स्त्रोत-**

संशोधनपत्रासाठी वार्षिक अहवाल व वेबसाईट इ. दुय्यम माहितीचा आधार घेतलेला आहे.

**कंपनीचे उद्देश :**

१) रेल्वेच्या पटरीवर घेतलेली किंवा अधिगृहीत जमिनीवर रेल्वेसाईड वेअरहाऊसिंग प्रकल्प किंवा टर्मिनल बहुप्रतिकृती साठवणुकीचा आराखडा (साठवणूकीचे) एक केंद्र बनविण्यासाठी योजना तयार करून विकसित करणे.
२) रेल्वेवर आधारित साठवणुकीद्वारे भारतात किंवा विदेशात सुधारित आपूर्ति साखळीस व व्यवस्थापन प्रणालीस प्रोत्साहन देऊन सेवा उपलब्ध करून देणे.
३) अत्याधुनिक गोदाम सेवा प्रदान करणे किंवा मालवाहू व वाहतूक क्षेत्राशी संबंधित बाबींची हाताळणी सोयीची करणे.
४) भारतात किंवा परदेशात मोठ्या प्रतिकृतीचे परिवहन कार्यक्रम चालू करणे, घरगुती व आयात-निर्यात कार्यासाठी तसेच माल वाहतुकीसाठी माल एकत्र करणे व ती पाठवून देणे इ. उद्दिष्ट्ये या कंपनीची आहेत.[1]

तक्ता क्र.१

**केंद्रीय रेलसाईड वेअरहाऊस कंपनी लि. च्या कार्यावर दृष्टीक्षेप**(रुपये लाखात)

| तपशिल | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सकल प्राप्ती | २४१५ (१००) | १५५१ (६४) | ३७५१ (१५५) | ५१०९ (२१२) | ७४६३ (३०७) | ८३९२ (३४८) | ९१३३ (३७८) |
| सकल खर्च | १८८८ (१००) | १०६७ (५७) | २६३७ (१४०) | ३९७९ (२११) | ५४८८ (२९१) | ५९४४ (३१५) | ६३३८ (३३६) |
| करागोदर लाभ/नफा | ५५९ (१००) | ४८४ (६७) | १११८ (२००) | ११३४ (२०३) | १९३२ (३४५) | २४४७ (४३८) | २७९५ (५००) |
| करानंतर लाभ/नफा | २४४ (१००) | ३२२ (१३२) | ८१४.९१ (३३४) | ७२२ (२१७) | १३३१ (५४६) | १६४७ (६७५) | १७६४ (७२४) |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **सकल फायदा** | ७३८ (१००) | ६४७ (८८) | १३६९ (१८४) | २०१८.६१ (२७४) | २९४९ (४००) | ३५०४ (४७५) | ३८०६ (५१९) |
| **निव्वळ मूल्य** | ४२२५ (१००) | ४६२२ (१०९) | ५४३७ (१२९) | ६०१७ (१४३) | ७११२ (१६८) | ८२७२ (१९६) | ९३०४ (२२०) |
| **प्रतिभाग उत्पन्न** | ७९४२.४५ | १०३६८.६७ | १.७८ | २.०० | ३.२८ | ४.०६ | ४.३५ |

स्रोत : www.crwc.in/crwc/finance report 2007-08 to 2013-14 2

तक्ता क्र.१ मध्ये केंद्रीय वखार महामंडळाची दुय्यम कंपनी केंद्रीय रेल्वेसाईड वेअरहाऊसींग कंपनी लि. ही आहे. ह्या कंपनीचा कारभार दि.२४.०७.२००७ पासून सुरू झालेला आहे. ह्या तक्त्यामध्ये कंपनीची सकल/ढोबळ प्राप्ती, सकल/ढोबळ खर्च, करागोदरचा लाभ, करानंतरचा लाभ, सकल/ढोबळ नफा इ. रक्कम रु.लाखात दर्शविली आहे.

**निष्कर्ष-**

तक्त्याच्या अभ्यासासाठी सन २००७-०८ हे पायाभूत वर्ष आहे. या वर्षी कंपनीकडील ढोबळ प्राप्ती रू.२४१५ लाख होती तर २०१३-१४ मध्ये ती रू.९१३३ लाखापर्यंत पोहचली आहे. म्हणजे २७८ टक्के इतकी वाढ झाली आहे. तसेच सकल/ढोबळ खर्च सन २००७-०८ मध्ये रू.१८८६ लाख इतका होता तर २०१३-१४ या वर्षी रु.६३३८ लाख इतका झाला आहे म्हणजे ढोबळ खर्च २३६% वाढत गेलेला दिसून येत आहे. ढोबळ नफा सन २००७-०८ या वर्षी रू.७३८ (१००%) लाख होता तर सन २०१३-१४ मध्ये रू.३८०६ लाख इतका आहे. म्हणजे ढोबळ नफ्यात ४१९% इतकी मोठी वृद्धी झालेली दिसून येत आहे.

आलेख क्र.१




ह्या कंपनीचा कराअगोदरचा नफा सन २००७-०८ मध्ये रू.५५९ लाख इतका होता तर सन २०१३-१४ या वर्षी तो रू.२७९५ लाख इतका झाल्याचे दिसून येत आहे. ही वृद्धी ४००% आहे. ह्या कंपनीच्या करानंतरच्या नफ्यात फार मोठी वृद्धी दिसून येत आहे. सन २००७-०८ मध्ये रू.२४४ लाख इतका करानंतरचा नफा आहे तर २०१३-१४ मध्ये तो रू.१७६४ लाख इतका झाला आहे त्यामध्ये ६२४% इतकी वाढ झाली आहे. कंपनीचे निव्वळ मूल्य सन २००७-०८ मध्ये रू.४२२५ लाख (१००%) इतके होते तर सन २०१३-१४ मध्ये कंनीच्या निव्वळ मूल्यात सतत वाढ होऊन ते रू.९३०४ म्हणजे १२० टक्क्यांनी वाढले आहे. कंपनी नवीन असताना सतत सर्वच बाबींमध्ये अग्रेसर असल्याचे दिसून येत आहे. अशाप्रकारचे कार्य सहकारी किंवा खाजगी क्षेत्रामध्येसुद्धा दिसून येत नाही.

**संदर्भ**

१. केंद्रीय रेल साईट वेअरहाऊस कंपनी लि., वार्षिक अहवाल, २०१३-१४, पृ.क्र.६.
2. www.crwc.in/crwc/finance report 2007-2008to 2013-14